International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 5 January – February - 2026

# संशोधन लेखन पद्धती

**सतिश सुदाम कांबळे[1], प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव[2]**

*[1]पीएच.डी.संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न, मराठी संशोधन केंद्र म वि प्र समाजाचे, के.टी.एच.एम. महाविद्यालय नाशिक*

*[2]मराठी संशोधन केंद्र मविप्र समाजाचे, के.टी.एच.एम. महाविद्यालय नाशिक*

*Corresponding Author – सतिश सुदाम कांबळे*

**DOI - 10.5281/zenodo.18899334**

**सारांश :**

*'Research' हा इंग्रजी शब्द असून मराठीत याचा अर्थ 'पुन्हा शोधने' असा होतो. मानवी जीवनाची सुरूवात पाषाण युगा पासून ते आजच्या 'ए आय' तंत्रज्ञान शोधापर्यंत झाली आहे. या शोधापासूनच मानवाने आपली असाध्य अशी प्रगती केली आहे. मानवी मन व मेंदू हा जिज्ञासु असल्याने शोधने हा त्याचा मूळ कार्यभाग असून; तो नियमितपणे कोणत्या न कोणत्या बाबींचा शोध घेत असतो.*

***संकेत शब्द – संशोधन, विषय निवड, तथ्याची मांडणी, कूतुहल, जिज्ञासा, तटस्थता, वाचनालय संयोजन, संदर्भ शोध, ग्रंथालयीन तालिका, साधन सुची.***

**प्रस्तावना :**

संशोधन हा शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रगतीचा कणा आहे. ज्ञान निर्मिती आणि सामाजिक विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. एखादा विषय संशोधनासाठी निवडताना सर्वप्रथम त्या विषयावर पूर्वी कोणी संशोधन केले आहे का? हे तपासणे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी विद्यापीठांमध्ये संशोधन झालेल्या विषयांची यादी पहावी. प्रबंध लेखनाला सुरुवात करण्यापूर्वी इतर प्रबंधाचे वाचन करावे. प्रबंध लिहिण्याची पद्धत समजून घ्यावी. तसेच संशोधनात संदर्भातील पुस्तकांचे वाचन करावे. त्यानंतर आपल्याला जो विषय निवडायचा आहे तो आधी समजून घ्यावा. आपल्या विषयासंदर्भात पूर्वी कोणी मते मांडले आहेत का ? ते पाहून मग आपल्या मताची मांडणी करावी. आपले मत अभिव्यक्त करताना संशोधनातील तथ्यांची मांडणी करावी. एखाद्या लेखकाच्या मताचे खंडन मंडन करताना त्याचा पुरावा देऊन मांडणी करणे अपेक्षित असते.

**संशोधन विषयाची निवड:**

संशोधन विषयाची योग्य निवड करणे फार महत्त्वाचे असते. प्रत्येकाच्या आवडीनुसार संशोधनाचा विषय घेता येतो; परंतु त्याला काही मर्यादा असू शकतात. विस्तृत क्षेत्र मर्यादा असणारा विषय आव्हानात्मक असतो, तेव्हा विषयाचा आवाका सिमित करून विषय निवडावा. संशोधनासाठी विषय निवडताना त्या अभ्यासकाला आपल्या विषयात रस असला पाहिजे, तसेच संशोधन करताना अभ्यासकाचे आपल्या विषयासंदर्भात कुतूहल जागृत राहिले पाहिजे. आवडीचा विषय अभ्यासकाने घेतला

तर त्यासाठी जिद्दीने चांगला प्रयत्न अभ्यासक करतो. विषय निवडताना त्या विषयासंदर्भातील वाचन झालेले असणे महत्त्वाचे आहे. तसेच त्या विषयासंदर्भातील काही नवीन विचार अभ्यासकाच्या मनामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. तरच संशोधनाची क्रिया सुरू होऊ शकते. निवडलेल्या विषयाचे कालचे आजचे आणि उद्याचे पैलू मांडावे लागतात. म्हणजेच एक ऐतिहासिक दृष्टी ठेवावी लागते. मागील संचित गुंडाळून अभ्यास साधने गोळा करणे, ती चिकित्सक पणे पारखून घेणे, आणि त्यातून स्वतःला सुचलेल्या मौलिक सिद्धांताची मांडणी करण्याचा प्रयत्न करणे. ही संशोधनाची प्रक्रिया असते. जो विषय अभ्यासकाने निवडला त्या संदर्भात तटस्थ राहून विषयाचे विश्लेषण करावे.

सकारात्मक दृष्टिकोनातून विषयाची निवड करावी. विवेच्य विषयासंदर्भात इतर विश्लेषकांची अवतरणे घेतल्यानंतर त्या अवतरणातील असे आपल्या शब्दात मांडूनच केवळ थांबणे योग्य नसते; तर त्यापेक्षा आपल्याला काय अधिक उणे म्हणायचे आहे ते लिहावे. उदाहरणार्थ एखाद्या संकल्पनेच्या चार जणांनी केलेल्या चार व्याख्या अभ्यासल्यानंतर त्या संकल्पनेची पाचवी व्याख्या आपल्याला मांडता यायला हवी अशा प्रकारे मांडणी करावी.

**वाचनाचे संयोजन :**

अभ्यासकाला संशोधनासाठी ग्रंथालय हे महत्त्वाचे साधन आहे. त्याचप्रमाणे आता संगणकाच्या महाजालाने माहिती गोळा करणे सोपे झाले आहे.

**संदर्भ शोध:**

अभ्यासकाला विषयाच्या अनुषंगाने संदर्भ देण्यासाठी ग्रंथांची आवश्यकता असते, तेव्हा आपल्या विषयासंदर्भातील संदर्भ ग्रंथ दोन पद्धतीने शोधता येऊ शकतात. प्रथम प्रत्यक्ष ग्रंथालयात जाऊन आणि दुसरे संगणकाच्या माध्यमाने, अशा संदर्भ ग्रंथाचा शोध कसा घ्यावा? ते पाहू.

**ग्रंथालयीन तालिका:**

या तालिका शब्द शोधातील शब्दक्रमाप्रमाणे तयार केलेल्या असतात. वेगवेगळ्या ग्रंथालयात तालिकांचे वर्गीकरण वेगवेगळ्या पद्धतीने केलेले असते. काही ठिकाणी ग्रंथकारांच्या आडनावातील अद्याक्षराने प्रारंभ केलेला असतो. काही ठिकाणी ग्रंथ नामातील पहिल्या शब्दातील अद्याक्षराने प्रारंभ होतो तर काही ठिकाणी विषयानुरूप मांडणी केलेली असते. तेव्हा त्या त्या ग्रंथपालाकडून माहिती घेऊन ग्रंथांचा शोध घ्यावा.

**संगणकीय शोध:**

संगणकामुळे जगातील कोणत्याही भागाची माहिती क्षणार्धात मिळते. त्यामुळे संगणकाच्या माध्यमाने साहित्य शोधणे सुलभ झाले आहे. कोणत्याही ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथाची माहिती संगणकाद्वारे मिळवता येते.

**तात्पुरती साधनसुची :**

प्रबंधाच्या शेवटी जी संदर्भसूची जोडली जाते, ती सूची आधी पुठ्ठीकेवर तयार केली जाते. अभ्यासकाने ज्या संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला, त्यानुसार वेगवेगळ्या पुठ्ठीका त्यांच्या मुळाक्षरांप्रमाणे तयार कराव्या. त्यामुळे शेवटी संदर्भसूची तयार करणे सोपे जाते. प्रथम अवांतर वाचन करून विषयाच्या कक्षा स्पष्ट करून घ्याव्या. विषयाचा दुसरपणा जाऊन त्याविषयीची कल्पना पक्की झाली की, त्याचे नेमके नामाभिधान कायम करावे. काही वेळा मूळ

शीर्षकापुढे उपशीर्षक देऊन विषय स्पष्ट करता येतो. उदाहरणार्थ " सावरकरांच्या निबंध वाडमय: शैली वैज्ञानिक अभ्यास किंवा महात्मा गांधी यांचे स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य परंपरा विरुद्ध आधुनिकता.' "

**टिपणे:**

टिपणे काढताना पुठ्ठीकांचा वापर केल्याने विषयानुसार मांडणी करणे सोपे जाते. पुठ्ठीका या जाड असल्यास हाताळणीसाठी सोयीच्या असतात. एका पुठ्ठीकेवर एकच मुद्दा मांडावा. संदर्भ ग्रंथाचे वाचन करत असतानाच पुठ्ठीका तयार कराव्यात.

**संदर्भ साधने:**

प्रबंध शक्यतो मूलभूत साधनांवर अवलंबून असला पाहिजे. अभ्यासकाने संशोधनासाठी जो विषय निवडला, त्या विषयासंदर्भातील मूळ ग्रंथाचा अभ्यास आपल्या संशोधनासाठी केला पाहिजे. जर मूळ ग्रंथांवरून इतर ग्रंथ रचले गेले असतील आणि त्याचा संदर्भ संशोधनात दिला असेल, तर तशी नोंद करावी. प्रबंधात दिलेल्या संदर्भा विषयी आपले मत मांडताना, पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन ठेवू नये. संशोधकाने आपल्या विषयासंदर्भातील ग्रंथांच्या एकाहून अधिक आवृत्त्या निघालेल्या असतील, तर सर्व आवृत्यांची दखल घेऊनच ग्रंथांची निवड करावी. अशा प्रकारे संदर्भ साधनांची प्रतवारी ठरविताना चोखंदळपणा ठेवून ग्रंथाला महत्त्व द्यावे.

**संदर्भ प्रक्रिया:**

प्रबंधामध्ये अवतरणांचा वापर केला जातो. ही अवतरणे मूळ ग्रंथावरूनच घ्यावी. संशोधन पर निबंध व प्रबंध म्हटला तरी तो स्वमताचाच अविष्कार असतो. इतरांची मते विचारात घेतानाही त्यावर स्वमताने भाष्य करावयाचे असते, तेव्हा टिपणींमध्ये असंख्य अवतरणे घ्यावी लागली असली तरी ती प्रबंधात योग्य विवेक बाळगला पाहिजे. प्रबंधात तळ टिपा या त्या पृष्ठाच्या तळाला दिल्या जातात. या तळ टिपा संशोधकाच्या विषयाशी कमी संबंधीत असल्या तरी, अन्य अभ्यासकांना यातून महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता असते.

प्रकरणांच्या शेवटी जो संदर्भ दिला जातो, त्याचाही क्रम ठरलेला आहे. संदर्भ देताना सुरुवातीला ग्रंथकार नाम द्यावे. मग ग्रंथनाम देऊन ग्रंथाला संपादक किंवा भाषांतर कार असल्यास त्याचे नाव द्यावे. यानंतर आवृत्तीचा उल्लेख करून प्रसिद्धी स्थल, प्रकाशक नाम, प्रसिद्धी काल, खंडातील संदर्भ असेल तर खंडाचा अंक आणि शेवटी पृष्ठांक असा क्रम द्यावा. संदर्भात 'तत्रैव' आणि 'उनि' यांचा वापर करताना, एकाच साधनाचा संदर्भ जेव्हा लागोपाठ येतो तेव्हा, 'तत्रैव' हा अधोरेखित शब्द योजावा आणि पृष्ठांक द्यावा. एखाद्या साधनाचा संदर्भ एकदा येऊन गेल्यावर मध्ये इतर साधनांचे संदर्भ देऊन पुन्हा वरील संदर्भ आल्यास ग्रंथकाराचे नाव देऊन 'उनि' हा संक्षेप योजावा आणि पृष्ठांक द्यावा.

**संशोधनाची मांडणी :**

संशोधनात प्रबंधाची मांडणी करताना सुरुवातीच्या मुखपृष्ठावर प्रबंधाचा विषय संशोधकाचे नाव व पत्ता मार्गदर्शकाचे नाव व पत्ता संशोधन केंद्र व वर्ष असा मजकूर येतो. यानंतर प्रास्ताविक मनोगत येते. मग अनुक्रमणिका, संक्षेप सूची, उपतघात, प्रस्तावना, प्रबंधाचा गाभा, उपसहार, परिशिष्टे, संदर्भसूची, विषय सूची अशी मांडणी केली जाते. अशाप्रकारे प्रबंधाची समग्र मांडणी केली जाते. प्रबंध लिहिताना विशिष्ट लेखन पद्धतीचा अवलंब करून लेखन करावे. विषयाच्या निवडीपासून तर प्रबंध पूर्णत्वास येईपर्यंत अभ्यासक्रमाला योग्य नियोजन करून आणि शिस्तबद्ध

पद्धतीने सर्व गोष्टी हाताळाव्या लागतात, याचे भान ठेवून लेखन करावे.

**निष्कर्ष:**

१) विद्यार्थ्यांना संशोधन म्हणजे काय ते समजेल.

२) संदर्भ ग्रंथाची मांडणी कशी करावी या गोष्टीची माहिती होईल.

३) संदर्भ ग्रंथ कसे शोधावे व त्याचा क्रम कसा द्यावा हे कळेल.

४) या गोष्टीमुळे संशोधन निपक्ष व दर्जेदार बनण्यास मदत होईल.

५) नव्या पिढीला संशोधन करण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ:**

१) मालशे गं.स., 'शोधनिबंधाची लेखन पद्धती' (संपा.मिलिंद मालशे), लोक वांङ्मय गृह मुंबई, पृष्ठ क्रमांक १२.

२) शेलार सुधाकर, 'साहित्य शोध: वाटा आणि वळणे', अक्षर वांङ्मय प्रकाशन पुणे, प्र.आ. १३ जून २०१९, पृ.क्र.१७.

३) मालशे गं. स. (संपा.मिलिंद मालशे), उनि, पृ.क्र.१४.

४) तत्रैव, पृ. क्र.३९.